जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार यांचे कार्यालय

—: सुचना :—

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार यांच्याकडील निविदा क. ०१—२०२५ अन्वये लिपिक—टंकलेखक शिपाई पद यांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून घेण्याकरीता प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदांची छाननी केल्यानंतर खालील अनुक्रमांक १ ते ६ निविदांना पुढील प्रक्रियेसाठी ग्राहय धरुन आर्थिक निविदा उघडणेकामी मंजूरी देण्यात आली आहे. खालील कंत्राटदार/संस्थांच्या आर्थिक निविदा दिनांक २५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. कार्यालयीन सोयीनुसार उघडण्यात येईल.

अनुक्रमांक	कंत्राटदार/संस्थेचे नाव
1	M/s Boss Security and Services
2	Chankya E-Services Pvt.Ltd.
3	Dilip Electrial and Contractor
4	Oriental Associates and Facility Management
5	Sant Gajanan Maharaj Bahuddeshiya Sanstha
6	Shreeram Printing Press

नामंजुर निविदा

२. खालील अनुक्रमांक १ ते १२ कंत्राटदार/संस्थेच्या तांत्रिक निविदा नमुद अटी व शर्ती नुसार नसल्याचे दिसुन येते. सदर निविदांमध्ये खालील स्वरुपाची त्रुटी आढळुन आली,

अ) समितीने मंजुर करुन प्रकाशित केलेल्या ई—निविदेतील अट क्रमांक 5.5.1 नुसार बोली लावणा—या **कंत्राटद्वार/ संस्थेस केंद्रशासन/राज्यशासन/केंद्रिय स्वायत्त संस्था इ**. ठिकाणी **लिपीक—कम—टायपिस्ट** व शिपाई **पदासारखे काम असलेले कर्मचारी** पुरविण्याचा **कमीत कमी ०३ वर्ष** अनुभव असणे व त्याबाबत **कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक होते. परंतू खालीलपैकी काही कंत्राट/संस्थेच्या दस्ताऐवजांमध्ये केवळ पुरवठा आदेश/कर्मचारी पुरविण्याबाबत पत्र/मंजुरी आदेश अशा स्वरूपाच्या दस्ताऐवजांचा समावेश आहे. त्या दस्ताऐवजांना कामकाज पुर्ण केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र म्हणुन ग्राहय धरता येणार नाही. त्याचप्रमाणे खालीलपैकी काही कंत्राटदार/ संस्थानी खाजगी कंपनी किंवा खाजगी संस्थेस (शासकीय किंवा शासनांशी संबंधित नसलेल्या) कर्मचारी पुरविल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर अनुभव ग्राहय न धरण्याचे समितीने एकमताने ठरविले. त्यामुळे कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर न करणे, सादर केलेले प्रमाणपत्र पुर्ण ०३ वर्षाचे नसणे, सादर केलेले प्रमाणपत्र शासकीय किंवा शासनांशी संबंधित नसलेल्या संस्थांना सेवा पुरविल्याबद्दलचे असणे या कारणास्तव सदर कंत्राटदार/संस्थेच्या निविदा नामंजुर करण्याचे समितीने एकमताने ठरविले. त्याचप्रमाणे खालीलपैकी काही कंत्राटदार/ संस्थानी पुरविलेली

सेवा लिपीक—कम—टायपिस्ट या सेवेसारखी नाही. त्यामुळे सदर सेवेचा अनुभव ग्राहय न धरण्याचे समितीने एकमताने ठरविले.

ब) निविदेतील अट क्रमांक 5.5.9 नुसार बोली लावणा—या कंत्राटद्वार/ संस्थेने **मागील ०३ वर्षाचे** म्हणजे Assessment Year २०२२—२०२३, २०२३—२०२४ आणि २०२४—२०२५ या कालावधीचे आयकर विवरण पत्र (Income Tax Return) च्या प्रती दाखल करणे आवश्यक होते. परंतु, खालीलपैकी काही कंत्राटदार/ संस्थांनी संपुर्ण ०३ वर्षाचे आयकर विवरण पत्र निविदेत दाखल केले नाही. त्याकारणास्तव सदर कंत्राटदार/संस्थेच्या निविदा नांमजुर करण्याचे समितीने एकमताने ठरविले.

क) निविदेतील अट क्रमांक 5.5.3 नुसार बोली लावणा—या कंत्राटदार/संस्थेने ऐपतीचा दाखला (Solvency Certificate) दाखल करणे आवश्यक होते. परंतु खालीलपैकी काही कंत्राटदार/संस्थेचे ऐपतीचे दाखले वित्तीय वर्ष २०२४—२०२५ पूर्वीचे आहेत. सदर कंत्राटदार/संस्थेच्या निविदा नांमजुर करण्याचे समितीने एकमताने ठरविले.

३. समितीने एकमताने खालील अनुक्रमांक १ ते १२ निविदा पुढील प्रक्रियेसाठी ग्राहय न धरण्याचे व आर्थिक निविदा उघडणेकामी नमुद कारणास्तव नामंजूर करण्याचे ठरविले.

अ. क्र.	कंत्राटदार/ संस्थेचे नाव	निविदा नांमजुर करण्याचे कारण
1	M/S.Alfa Enterprises	१) मागील ०३ वर्षापैकी Assessment Year २०२३—२०२४ चे आयकर विवरण निविदेसोबत दाखल नाही. २) ऐपतीचा दाखल्यावर तारीख नमुद नाही व सदर दाखला सन २०२१—२२ च्या ताळेबंदाच्या आधारावर दिल्याचे नमुद आहे. त्यामुळे सदर दाखला वित्तीय वर्ष २०२४—२०२५ पुर्वीचा दिसुन येतो.
2	Astitiva Multipurpose Services pvt ltd	लिपीक—कम—टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही.
3	Force Facility Management Services	लिपीक—कम—टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही.
4	M/s.Krishna Vidyut and Infra Pvt Ltd	मागील ०३ वर्षाचे आयकर विवरण निविदेसोबत दाखल नाही.
5	Maharashtra Sushikshit Berojgar Bahuddeshiy Seva Sahkari Sanstha	ऐपतीचे दाखले दिनांक २४/०७/२०२३ व २४/०१/२०२४ रोजीचे म्हणजे वित्तीय वर्ष २०२४—२०२५ पुर्वीचे आहेत.

6	**Sai Manpower Services**	१) लिपीक–कम–टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही. २) ऐपतीचा दाखला दिनांक ०१/११/२०२३ रोजीचा म्हणजे वित्तीय वर्ष २०२४–२०२५ पुर्वीचा आहे.
7	**Savitrimai Pvt Ltd**	१) लिपीक–कम–टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही. २)मागील ०३ वर्षापैकी Assessment Year २०२२–२०२३ चे आयकर विवरण निविदेसोबत दाखल नाही.
8	**Savitrimai S.B.Seva Saha. Sanstha**	लिपीक–कम–टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही.
9	**S.D.N. Enterprises**	मागील ०३ वर्षाचे आयकर विवरण निविदेसोबत दाखल नाही.
10	**M/s Shiv Krupa Services**	लिपीक–कम–टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही.
11	**M/s Shree Swami Services**	लिपीक–कम–टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही.
12	**Winsol Solution Pvt.Ltd.**	लिपीक–कम–टायपिस्ट या सेवेसारखी सेवा शासकीय किंवा शासनांशी संबंधित कार्यालयांना पुरविण्याचा एकुण ०३ वर्षाचा अनुभव असल्याचे व कामकाज पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र नाही.

आदेशान्वये,

२४/७/२०२५

(एम.बी.पाटील)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
नंदुरबार

दिनांक :२४/०७/२०२५
नंदुरबार